Vol 4 Issue 3 Dec 2014

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 4 | Issue. 3 | Dec. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# हरिहरेश्वर पर्यटनस्थळाचा भौगोलिक अभ्यास

**राजाराम महादेव थोरात**

भूगोल विभाग प्रमुख , द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा,
ता. तळा, जि. रायगड.

**सारांश:**

*प्रस्तुत शोधनिबंधात रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर या ऐतिहासिक, धार्मिक आणि निसर्ग सौंदर्याने नटलेल्या पर्यटनस्थळाचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. मानव संसाधनाचा विकास हा नैसर्गिक संसाधनाच्या विकासावर अवलंबून असतो. हरिहरेश्वर हे धार्मिक पर्यटन स्थळ भारताची दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे.*

## प्रस्तावना :–

*अरबी सागर किनाऱ्यावर वसलेले आणि निसर्ग सौंदर्याने नटलेल्या हरिहरेश्वर या भौगोलिक पर्यटन केंद्राला खुप महत्त्व आहे. या परिसरात हिरवीगार वनराई, निसर्गरम्य, स्वच्छ सुंदर सागर किनारा असल्यामुळे अनेक देशी–विदेशी पर्यटक दरवर्षी येत असतात. या परिसरात पर्यटकांच्या आवडी–निवडीनुसार राहण्याच्या आणि जेवणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तसेच प्रशासनाने पायाभूत सेवा–सुविधांचा विकास करण्याची गरज आहे. कारण या परिसरातील मानव संसाधनाचा विकास नारळ, सुपारी, आंबा, मासेमारी या उत्पादनाबरोबरच पर्यटन व्यवसायाच्या विकासावर अवलंबून आहे. सदर शोध निबंधात 'हरिहरेश्वर'पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास करण्यात आला आहे.*

## 2.उद्दिष्ट्यो:

*हरिहरेश्वर या पर्यटन स्थळाचा ऐतिहासिक, धार्मिक, प्राकृतिक आणि आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे. तसेच हरिहरेश्वर परिसरातील पर्यटन सुविधांचे अध्ययन करणे आणि पर्यटन व्यवसायाचा विकास होण्यासाठी उपाय सुचविणे.*

## 3. अभ्यासक्षेत्र:

*दक्षिण काशी म्हणून भारतात प्रसिद्ध असणारे हरिहरेश्वर हे धार्मिक तीर्थक्षेत्र अरबी समुद्र किनाऱ्यावर वसलेले आहे. मुंबईपासून २१० कि.मी. व पुण्यापासून २०५ कि.मी. अंतरावर श्रीवर्धन तालुक्यात या पर्यटन स्थळाचा समावेश होतो. हरिहरेश्वरचे भौगोलिक स्थान १८००० ' उत्तर अक्षांश व ७३००० ' पूर्व रेखांशावर आहे. छत्रपती शाहूंचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट (१७१३–२०) यांचे हे जन्मगांव आहे. सागर सानिध्य व निसर्ग सौंदर्यामुळे हे ठिकाण पर्यटकांना भुरळ घालते. हरिहरेश्वर व कालभैरव या देवतांचे धार्मिक महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. कालभैरव हे महादेवाचे रूप आहे. परंपरागत पद्धतीनुसार प्रथम कालभैरवाचे व योगेश्वरीचे दर्शन घेतल्यानंतर क्रमाने शेजारच्या हरिहरेश्वर मंदिरातील नंदी व गणपती, नंतर हरिहरेश्वराचे आणि परत कालभैरव व योगेश्वरीचे दर्शन घ्यावयाचे असते. कालभैरवाच्या दर्शनाने व कृपा प्रसादाने भूतपिशाच्च बाधा नाहीशी होते. असा भाविकांचा समज आहे. हरिहरेश्वरच्या कालभैरवाची जागृत देवस्थान म्हणून मोठी प्रसिद्धि आहे. भूतबाधा झालेले अनेक लोक येथे येतात. अतृप्त आत्म्यांना मुक्ती देण्याचे गतिश्राद्ध तसेच नारायण नागबळी, श्राद्धबळी हे विधीही येथील शुक्लतीर्थावर करतात. मात्र ते गुरव पुजारी बोखेडी झुडपाच्या लालसर लांबट आकाराच्या कळ्यांचा*

कालभैरवास कौल लावल्यावरच करतात. याला 'कळे लावणे' असे म्हणतात. येथील पांडव तीर्थावर उत्तर क्रिया सुद्धा करतात. मंदिराच्या पश्चिमेस असलेल्या टेकड्या व पलिकडील सागर किनारा या सर्व परिसरात विष्णुपद, गायत्री तीर्थ, चक्रतीर्थ, सुर्यतीर्थ, यज्ञकुंडे, विष्णुतीर्थ, ब्रह्मगुहा, कोसाची प्रदक्षिणा मार्ग तसेच अनेक तीर्थे व धार्मिक ठिकाणे आहेत. त्यामुळे हरिहरेश्वरला दक्षिण काशी असे म्हणतात.

## 4. संशोधन पद्धतीः

सदर शोधनिबंधातील माहिती रायगड जिल्हा राजपत्र, रायगड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि द्वितीयक माहिती स्त्रोताचा उपयोग केला आहे.

## 5. हरिहरेश्वरः

अरबी समुद्र किनाऱ्यावरील निसर्गरम्य हिव्यागार वनराईत स्वच्छ सुंदर परिसरात हरिहरेश्वर हे ऐतिहासिक व धार्मिक तीर्थक्षेत्र वसलेले आहे. अल्हाददायक हवामान असल्यामुळे अनेक पर्यटक शहरी जीवनाला कंटाळून विरंगुळा मिळविण्यासाठी हरिहरेश्वरला येतात. हरिहरेश्वर व कालभैरव ही महत्त्वाची मंदिरे आहेत. सर्व ठिकाणच्या कालभैरवाच्या मुर्ती दक्षिणाभिमुख असतात. परंतू हरिहरेश्वरचा कालभैरव मात्र उत्तराभिमुख आहे. दंतकथेनुसार असे सांगितले जाते की, हरिहरेश्वरच्या कालभैरवाची ख्याती ऐकून सर्व कालभैरवामधील मुख्य जो काशीचा कालभैरव त्याने हरिश्वरच्या कालभैरवाचे महात्म्य प्रत्यक्ष पाहण्याचे ठरविले व रातोरात हरेश्वरास जाऊन सुर्योदयापूर्वी काशीस परत जाण्याचे ठरवून तो निघाला. हरिहरेश्वरच्या कालभैरवास हे कळताच उत्तरेकडून येणाऱ्या काशीच्या कालभैरवाचे स्वागत करण्यासाठी तो उत्तराभिमुख उभा राहिला. परंतू काशीचा कालभैरव श्रीवर्धनला आल्यावर पहाटेचा कोंबडा आरवला. त्यामुळे तो श्रीवर्धनलाच स्थिर झाला. मात्र त्याच्या स्वागतास उत्तराभिमुख उभा राहिलेला हरेश्वरचा कालभैरव त्याच स्थितीत उभा राहिला असे म्हणतात.

हरिहरेश्वर व कालभैरव या दोन जागृत देवस्थानांची मंदिरे एकमेकांना लागून आहेत. कालभैरवाचे मंदिर लहान असून ते हरिहरेश्वराच्या पश्चिमेस आहे. पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर डाव्या बाजूच्या कोपऱ्यात कालभैरव व त्याच्या डाव्या बाजूस योगेश्वरी अशा दोन उभ्या लहान मूर्ती आहेत. मंदिरात लाकडी खांबाच्या चार रांगा असून चारही बाजूंचे शेवटचे खांब भिंतीत आहेत. उत्तरेकडील भिंतीत नवीन दरवाजा बांधला आहे. मंदिरात सुंदर नक्षीकाम आहे.

कालभैरव मंदिराच्या पूर्वेस चौथऱ्यावर हरिहरेश्वराचे मंदिर आहे. पश्चिमेच्या मुख्य लाकडी दरवाजातून प्रवेश केल्यावर डाव्या बाजूस नंदी व उजव्या बाजूस गणपती व गरूडाच्या मूर्ती आहेत. डाव्या बाजूच्या भिंतीत पालखी दरवाजा व उजव्या बाजूच्या भिंतीत एक दरवाजा आहे. सहा दगडी खांबांवर संपूर्ण मंदिर आधारलेले असून त्यावर वरच्या बाजूस चक्रे व नाग कोरलेले आहेत. सलग लांबट दगडी चौकोनात पहिला लहानसा उंचवटा ब्रह्मदेवाचे प्रतीक, दुसरा विष्णुदेवाचे आणि शेवटी महेश व पार्वतीचे प्रतीक मानतात. गाभाऱ्यावर शिखर आहे. शिखराच्या घुमटात एकावर एक अशा चार अष्टकोनाकृती असून शेवटच्या अष्टकोनात चौकोन व त्यात श्रीयंत्र साधलेले आहे. त्यामुळे येथे लक्ष्मीसह विष्णू आहे असा समज आहे. हरिहरेश्वर मंदिराच्या पाठीमागे मारूतीचे मंदिर आहे. कालभैरव मंदिराच्या पश्चिमेस यात्रेकरूंसाठी एक धर्मशाळा आहे. दोन पिंपळ वृक्षांच्या पारांच्या पलिकडे परंतू मंदिराच्या आवाराच्या हद्दिबाहेर ब्रह्मकूप आहे. कालभैरव मंदिराचा जीर्णोद्धार पहिल्या बाजीराव पेशव्याने (१७२०–४०) १७२३ साली केला हे शीलालेखावरून स्पष्ट होते. कान्होजी आंग्ऱ्याने १०००/– रूपये दिले होते. पश्चिमेकडील टेकडीवर चढून जाण्यासाठी जावळीच्या चंद्रराव मोरे यांनी पायऱ्या बांधल्या आहेत. पहिल्या माधवराव पेशव्याची पत्नी रमाबाईने १७६७ मध्ये चौघडा इमारत बांधून चौघडा वादनाची प्रथा सुरू केली. त्यानंतर ४ एप्रिल १७७२ रोजी माध्वरावाची प्रकृती सुधारण्यासाठी प्रार्थना करण्यास रमाबाई हरेश्वरला आली होती. तेथे महाशिवरात्री (तीन दिवस), कार्तिक शुद्ध एकादशी ते पौर्णिमा आणि कालाष्टमी निमित्ताने यात्रा भरतात. धर्मशाळेजवळ असलेली तोफ १७३३ पासून आजपर्यंत तीनही उत्सवांच्या वेळी रोज रात्री उडवतात.

## 6. निष्कर्षः

रायगड जिल्ह्यात हिरवीगार वनराई, स्वच्छ व सुंदर निसर्गरम्य सागर किनारे आहेत. रायगड जिल्ह्यास ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक आणि राजकीय दृष्टीकोनातून फारच महत्व आहे. त्यामुळे हरिहरेश्वर सारख्या निसर्गरम्य परिसरातील पर्यटन स्थळाचा सर्वांगिण विकास करण्याची खरी गरज आहे. पृथ्वीमातेने या परिसरात नैसर्गिक सौंदर्याची उधळण केली आहे. त्याचा उपयोग करून पर्यटन व्यवसायाचा विकास करून स्थानिक परिसरातील मानव संसाधनांचा विकास करता येईल. त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करता येईल. त्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन व इतर स्थानिक संस्थांनी, निसर्गप्रेमी नागरिक, पर्यटन व्यवसायात कार्यरत तज्ज्ञ, संशोधक व अभ्यासक यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. पर्यटन विकास साध्य करताना निसर्ग व ग्रामीण लोकजीवन आबाधित कसे राहील याचा विचार व्हायला हवा. पर्यटनातून उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना ठरविण्यात याव्यात. पर्यटन स्थळांचे योग्य व्यवस्थापन केल्यास हरिहरेश्वर या निसर्ग सौंदर्याने नटलेल्या पर्यटन स्थळाचा विकास निश्चित होईल. त्यासाठी पायाभूत सेवा–सुविधांचा विकास करण्याची गरज आहे.

## 7. संदर्भग्रंथः

१.रायगड जिल्हा राजपत्र
२.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
३.कुलाबा जिल्हा राजपत्र
४.घारपुरे विठ्ठल (२००१): पर्यटन भूगोल
५.Batra K.L.S. (1990): Problems and Prospects of Tourism, Printwell Publisher, Jaipur.
६.Singh, Swadeh Kumar (1985): "Tourist Industry In Bihar" Annuals. Vol. 15, PP. 22.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org